महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१**
दु.क्र.(का)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**क्र. पी.आर-३/सबसिडी/** No 34342 **दिनांक :** 12 DEC 2012

**वाणिज्य परिपत्रक क्र.** १८१

(या विषयावरील वाणिज्य परिपत्रक क्र. १७९ रद्द करण्यात आलेले आहे)

**विषय :-** यंत्रमागधारकांना पुरविण्यात येणा-या शासनाच्या सवलतीच्या वीजदरात सुधारणा करणेबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निणय क्र. टॅरिफ-२००७/प्र.क्र. २७/ऊर्जा-३ दिनांक २६/०२/२००८.
२) शासन निणय क्र. टॅरिफ-२००७/प्र.क्र. २७/ऊर्जा-३ दिनांक ३१/०१/२००९.
३) शासन निणय क्र. विपुअ-२०१२/प्र.क्र. ९१/ऊर्जा-३ दिनांक ११/१०/२०१२.
४) वाणिज्य परिपत्रक क्र. १७९ दि. ०१.१२.२०१२.

शासन निर्णय क्र. विपुअ-२०१२/प्र.क्र. ९१/ऊर्जा-३ दिनांक ११/१०/२०१२ अन्वये दि. ०१.०८.२०१२ पासून शासनाने यंत्रमागधारकांना देय असलेल्या सवलतीच्या दरामध्ये सुधारणा केलेली आहे. त्याअनुषंगाने यंत्रमागधारक विज ग्राहकांना आकारावयाचा स्थिर आकार, वीज आकार व इंधन समायोजन आकार वाणिज्य परिपत्रक क्र. १७९ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आलेले होते. तथापी सदर वाणिज्य परिपत्रक क्र. १७९ मधे खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१) राज्यातील यंत्रमागधारक ग्राहकांना पुरविण्यात येणा-या वीजेच्या दरात सवलत देण्यासाठी शासनाकडून सध्या प्रति युनिट जेवढया रकमेचे अनुदान देण्यात येते त्या मर्यादेपर्यंत अनुदान यापूढेही चालू राहील.

२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दि. १६ ऑगस्ट २०१२ च्या आदेशामुळे राज्यातील यंत्रमागधारक ग्राहकांच्या वीज दरात माहे ऑगस्ट २०१२ पूर्वीच्या तुलनेत जी वाढ करावी लागणार आहे ती यंत्रमागधारक ग्राहकांनी भरावी.

३) वरील (१) प्रमाणे लागू होणा-या सवलतीच्या दराव्यतिरिक्त (देय असल्यास) इंधन समायोजन आकार किंवा अन्य प्रकारचा दंडात्मक आकार यंत्रमागधारक ग्राहकांनी १०० टक्के भरणे आवश्यक राहील.

४) सदरचे अनुदान पूर्वी वीज आकार, स्थिर आकार व इंधन समायोजन आकारात मिळत असेल. यंत्रमागधारक ग्राहकांना देण्यात येणा-या स्थिर आकार व वीज आकारातील सवलतीच्या टक्केवारीत अशाप्रकारे सुधारणा करण्यात यावी जेणेकरुन, ऑगस्ट २०१२ पूर्वी लागू असणा-या वीज दराप्रमाणे इंधन समायोजन आकार मिळत असलेल्या अनुदानाची रक्कम सुध्दा विचारात घेऊन ग्राहकास मिळत असलेल्या अनुदानाच्या रकमेत कोणताही बदल होणार नाही.

सदरहु शासन निर्णयात सदरचे अनुदान पूर्वी वीज आकार, स्थिर आकार व इंधन समायोजन आकारात मिळत असलेल्या सवलतीच्या टक्केवारीत अशाप्रकारे सुधारणा करण्यात यावी जेणेकरुन, ऑगस्ट २०१२ पूर्वी लागू असणा-या वीज दराप्रमाणे इंधन समायोजन आकार मिळत असलेल्या अनुदानाची रक्कम सुध्दा विचारात घेऊन ग्राहकास मिळत असलेल्या अनुदानाच्या रकमेत कोणताही बदल होणार नाही असे शासनाने नमुद केलेले आहे. वाणिज्य परिपत्रक क्र. १७९ मधे निर्देशित केल्याप्रमाणे यंत्रमागधारकांकडून आकारावयाचा इंधन समायोजन आकार (वाणिज्य परिपत्रकाच्या तक्त्यामधील स्तंभ क्र. ५ मध्ये ) शासन निर्णयामध्ये अभिप्रेत असलेला अर्थ सुस्पष्ट होत नसल्याचे निदर्शनास आले. शासन निर्णयानुसार इंधन समायोजन आकार माहे ऑगस्ट २०१२ मध्ये आकारण्यात आलेला इंधन समायोजन आकाराचा आधार घेण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने यंत्रमागधारकाने भरणा करावयाचा इंधन समायोजन आकाराच्या आकारणीमध्ये (रकाना क्र. ५) खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र | वर्गवारी | स्थिर /मागणी आकार | विज आकार | इंधन समायोजन आकार |
|---|---|---|---|---|
| | | | **पैसे प्रति युनिट** | **पैसे प्रति युनिट** |
| | **लघुदाब यंत्रमागधारक** | | | |
| १ | २७ अ.श. पर्यत जोडभार | रु. ४० प्रति जोडणी प्रति महिना | २८३ | ४४ पैसे/युनिट मर्यादेपर्यंत इंधन समायोजन शुल्काच्या ५०%, या व्यतिरिक्त इंधन समायोजन आकार ४४ पैसे/युनिट पेक्षा अधिक झाल्यास ४४ पैसे वरील सर्व इंधन समायोजन आकार ग्राहकास भरावा लागेल |
| २ | २७ अ.श. चे वर जोडभार | रु. ३० प्रति केव्हीए प्रति महिना | २९० | ६० पैसे/युनिट मर्यादेपर्यंत इंधन समायोजन शुल्काच्या ५०%, या व्यतिरिक्त इंधन समायोजन आकार ६०पैसे/युनिट पेक्षा अधिक झाल्यास ६० पैसे वरील सर्व इंधन समायोजन आकार ग्राहकास भरावा लागेल |
| | **उच्चदाब यंत्रमागधारक** | | | |
| १ | एक्सप्रेस फिडरवरील | रु. १३० प्रति केव्हीए प्रति महिना | ४६० | ६० पैसे/युनिट मर्यादेपर्यंत इंधन समायोजन शुल्काच्या ६०%, या व्यतिरिक्त इंधन समायोजन आकार ६० पैसे/युनिट पेक्षा अधिक झाल्यास ६० पैसे वरील सर्व इंधन समायोजन आकार ग्राहकास भरावा लागेल |
| २ | नॉन-एक्प्रेस फिडरवरील | रु. १३० प्रति केव्हीए प्रति महिना | ४१३ | ५४ पैसे/युनिट मर्यादेपर्यंत इंधन समायोजन शुल्काच्या ६०%, या व्यतिरिक्त इंधन समायोजन आकार ५४ पैसे/युनिट पेक्षा अधिक झाल्यास ५४ पैसे वरील सर्व इंधन समायोजन आकार ग्राहकास भरावा लागेल |

शासन निर्णयामध्ये असेही नमुद करण्यात आले आहे की, सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे दि. ०१.०८.२०१२ पासून करण्यात यावी. तसेच वरीलप्रमाणे देण्यात येणा-या वीज दरातील सवलतीमुळे महावितरण कंपनीस होणारी महसुलाची नुकसान भरपाई करण्यासाठी आतापर्यंत राज्य शासनाकडून देण्यात येत असलेले अनुदान यापूढेही चालू राहील.

तसेच शासनाची सवलत व शासनावर पडणारा इंधन समायोजन आकाराचा अधिकत्तम बोजा व यंत्रमागधारकांने भरणा करावयाची इंधन समायोजन आकाराची रक्कम याचे सहउदाहरण सोबतच्या सहपत्रात देण्यात आलेले आहे.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांस कळविण्यात येते की, इंधन समायोजन आकाराची आकारणी वर निर्देशित केलेल्या सुधारीत परिगणनेनुसार व सोबत जोडलेल्या मार्गदर्शक उदाहरणांच्या परिशिष्टानुसार करण्यात यावी. तसेच वाणिज्य परिपत्रक क्र. १७९ दि. ०१.१२.२०१२ रद्द झाल्याचे समजण्यात यावे.

**सहपत्र : सुधारीत उदाहरणांचे परिशिष्ट**

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत माहितीस रवाना :**

मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान)

-- वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने यंत्रमाग ग्राहकांच्या देयकाच्या सगणक प्रणालीमध्ये आवश्यकते बदल करण्यात यावेत. तसेच वरील निर्णया स्वरुप ग्राहकांकडून वसुल करावयाची रक्कम त्यांचे पुढील विज देयकात समायोजित करण्यात यावी.

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**

## उदाहरणांचे परिशिष्ट:

शासन निर्णयानुसार इंधन समायोजन आकार आकारण्याकरीता माहे ऑगस्ट २०१२ मधे आकारण्यात आलेला इंधन समायोजन आकाराचा आधार घेण्यात आलेला आहे. या नुसार शासनाची सवलत व शासनावर पडणारा इंधन समायोजन आकाराचा महत्तम बोजा खालील प्रमाणे-

| अ.क्र | वर्गवारी | माहे ऑगस्ट २०१२ मधे आकारण्यात आलेला इंधन समायोजन आकार (पैसे/युनिट) | इंधन समायोजन आकारात शासनाची सवलत (%) | शासनावर पडणारा इंधन समायोजन आकाराचा महत्तम बोजा (पैसे/युनिट) |
|---|---|---|---|---|
| | **लघुदाब यंत्रमागधारक** | | | |
| १ | २७ अ.श. पर्यंत जोडभार | ४४ | ५०% | २२ |
| २ | २७ अ.श. चे वर जोडभार | ६० | ५०% | ३० |
| | **उच्चदाब यंत्रमागधारक** | | | |
| १ | एक्सप्रेस फिडरवरील | ६० | ४०% | २४ |
| २ | नॉन-एक्प्रेस फिडरवरील | ५४ | ४०% | २२ |

## उदाहरण:

| अ.क्र | वर्गवारी | इंधन समायोजन आकार (पैसे/युनिट) | शासनावर पडणारा बोजा (पैसे/युनिट) | ग्राहकाने भरणा करावयाचा आकारा (पैसे/युनिट) |
|---|---|---|---|---|
| | **लघुदाब यंत्रमागधारक** | | | |
| १ | २७ अ.श. पर्यंत जोडभार | २२ | ११ (५०%) | ११ (५०%) |
| | | २० | १० (५०%) | १० |
| | | ४४ | २२ (५०%) | २२ |
| | | ४२ | २१ (५०%) | २१ |
| | | ४५ | २२ (अधिकत्तम) | २३ |
| | | ५० | २२ (अधिकत्तम) | २८ |
| २ | २७ अ.श. चे वर जोडभार | ३० | १५ (५०%) | १५ (५०%) |
| | | २४ | १२ (५०%) | १२ |
| | | ४२ | २१ (५०%) | २१ |
| | | ६० | ३० (५०%) | ३० |
| | | ६७ | ३० (अधिकत्तम) | ३७ |
| | **उच्चदाब यंत्रमागधारक** | | | |
| १ | एक्सप्रेस फिडरवरील | २४ | ९.६० (४०%) | १४.४ ० (६०%) |
| | | २० | ८ (४०%) | १२ |
| | | ४८ | १९.२० (४०%) | २८.८० |
| | | ५८ | २३.२० (४०%) | ३४.८० |
| | | ६० | २४ (४०%) | ३६ |
| | | ७० | २४ (अधिकत्तम) | ४६ |
| २ | नॉन-एक्प्रेस फिडरवरील | २२ | ८.८० (४०%) | १३.२० (६०%) |
| | | १८ | ७.२० (४०%) | १०.८० |
| | | ४४ | १७.६० (४०%) | २६.४० |
| | | ५५ | २२ (४०%) | ३३ |
| | | ६० | २२ (अधिकत्तम) | ३८ |
| | | ६६ | २२ (अधिकत्तम) | ४४ |